MHJN040012372017

| | | |
|---|---|---|
| दाखल दि. | - | २८.०८.२०१७ |
| नोंदणी दि. | - | २८.०८.२०१७ |
| निकाल दि. | - | २०.०४.२०२६ |
| कालावधी | - | ०८ वर्ष ०७ महिने २३ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३), अंबड, यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : श्वेता एस. परीहार)**

नि क्र.३५

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | : | २०/०४/२०२६ |
| नियमित फौजदारी खटला क्रमांक | : | १९०/२०१७ |
| प्रथम खबर अहवाल क्र. | : | १०७/२०१७ |
| पोलीस स्टेशन | : | गोंदी |

महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलीस ठाणे अधिकारी,
पोलीस ठाणे, गोंदी
ता. अंबड, जि. जालना. **......अभियोग पक्ष**

**सरकार तर्फे -** सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.पी.साळवे.

**-विरुध्द-**

**शंकर सोनाजी खराद**
वय : २६ वर्षे, धंदा : शेती,
रा. डोमलगाव, ता. अंबड,जि. जालना. **......आरोपी**

**आरोपीतर्फे -** विधीज्ञ श्री. एन. आर. मापारी

**भाग – 'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २८.०३.२०१७ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ३१.०३.२०१७ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | २८.०८.२०१७ |
| दोषारोप निश्चित तारीख | १९.०४.२०२३ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | १६.०४.२०२६ |

| | |
|---|---|
| प्रकरण न्यायनिर्णय करीता ठेवले ती तारीख | १८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २०.०४.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | -- |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी.सी. प्रमाणे शिक्षेमधुन सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शंकर सोनाजी खराद** | ०५.०४.२०१७ | ०५.०४.२०१७ | भांदवि कलम ३५४, ५०४ व ५०६ | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले | - | - |

**भाग — 'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष -**

| स्थान | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | पिडीता | २६ | फिर्यादी |

**ब) बचाव पक्ष, असल्यास -**

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास -**

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची / निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या**

## दस्तांची यादी

**अ) अभियोग पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | | |

**ब) बचाव पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

**क) न्यायालयीन दस्तऐवज -**

| अ.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

**ड) भौतिक वस्तु -**

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(दिनांक २०.०४.२०२६ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधान १८६० कलम ३५४, ५०४ व ५०६ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणेः-**

२. फिर्यादी/पिडीता हिने गोंदी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दि.२८.०३.२०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास ती अंगनात एकटीच स्वंयपाक करीत होती व तिचे पती हे अंघोळ करण्यासाठी गंगेवर गेले होते. तेव्हा त्यांच्या गावावातील शंकर खराद हा दारू पिऊन दारूच्या नांदात तिच्या अंगनात आला व तिला म्हणाला की, ‘ तुझा पती कुठे आहे, आमचे दोघांचे ऊस लागवडीचे सरपचांकडे राहिलेले

पैसे देणे आहे'. तेव्हा ती त्यास घरी कोणी नाही नंतर या अशी म्हणाली असता, तिला एकटीला पाहून शंकर खराद याने वाईट हेतूने तिला मिठी मारली व दोन्ही हाताने तिची छाती दाबली व तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले. तिने त्यास प्रतिकार केला असता त्याने तिला शिवीगाळ करून तिला गप्प बस नाही तर जिवे मारून टाकेल अशी धमकी दिली. तेव्हा तिने त्याच्या तावडीतून सुटण्यासाठी त्याला धक्का दिला असता तो खाली पडला व त्याच्या डोक्याला मार लागला. त्यांचा आरडा ओरडा एकूण तिची सासू केशरबाई व भाया बालाजी यांनी त्यास अंगनाच्या बाहेर काढून दिले.

३. सदर तक्रारीवरुन गोंदी, पोलीस ठाणे येथे आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक १०७/२०१७ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. एस.एम.सय्यद यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर मी आरोपीविरुद्ध नि.क्र.१२ वर भारतीय दंड विधान १८६० कलम ३५४, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप नोंदविला. सदर दोषारोप आरोपीस समजावुन सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली असे अभिलेखावरून दिसून येते.

५. आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने सा.क्र.१ फिर्यादी/पिडीता हिची साक्षी नि.क्र.२६ वर नोंदवली आहे व इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाही. सदरील प्रकरणात इतर साक्षीदारांना साक्षीसमन्स काढण्यात आले होते परंतू, ते न्यायालयात हजर झाले नाहीत.

६. आरोपीविरुद्ध दोषपुर्ण कथन पटलावर आले नसल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

७. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. आर. मापारी यांचा युक्तीवाद ऐकला.

८. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि.२८.०३.२०१७ रोजी सकाळी ९.०० वाजता मौजे डोमलगाव, ता. अंबड, जि. जालना येथे आरोपीने फिर्यादी/पिडीतेची छाती दाबली व तिचा विनयभंग केला ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादी/पिडीतेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल या उद्देशाने तिचा अपमान केला ? | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादी/पिडीतेस फौजदारीपात्र धाकदपशा केला ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**कारणमिमांसा**

**मुद्दे क्र. ०१ ते ०३ करीता -**

९. सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने विनासंशय खालील बाबी सिद्ध करणे आवश्यक आहे.

**a)** आरोपीने फिर्यादी/पिडीतेची छाती दाबली व तिचा विनयभंग केला.

**b)** आरोपीने फिर्यादी/पिडीतेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल या उद्देशाने तिचा अपमान केला.

**c)** आरोपीने फिर्यादी/पिडीतेस फौजदारीपात्र धाकदपशा केला.

१०. अभियोग पक्षाने त्यांचे म्हणणे सिध्द करण्यासाठी या प्रकरणातील महत्वाचे व जखमी साक्षीदार क्रमांक १ (फिर्यादी) हिची साक्ष नोंदविली आहे. तिने तिच्या

पूराव्यादरम्यान घटना कधी व कोठे घडली हे तिला सांगता येणार नसल्याचे कथन केले. तसेच, तिने कथन केले आहे की, घटनेच्या दिवशी शंकर व जनार्धन यांचे मध्ये किरकोळ वाद झाले होते. त्यामूळे तिने आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. तसेच, तिने फिर्यादीतील मजकूर तिला माहित नसल्याचे सांगीतले व पोलीसांनी त्याला फिर्याद वाचून दाखवली नसल्याचे कथन केले. फिर्यादी अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला उलटतपासणीच्या स्वरुपातील प्रश्ने विचारली. त्यामध्ये त्याने दि.२८.०३.२०१७ रोजी सकाळी ९.०० वाजेच्या सूमारास ती तिच्या घरासमोर अंगनात एकटीच सोयंपाक करत होती व तिचे पती गंगेवर अंघोळीला गेले होते त्यावेळी त्यांच्या गावतील आरोपी तेथे आला व त्याने तिला विचारले की, 'तुझा पती कुठे आहे, आमचे ऊस लागवडीचे पैसे त्याच्याकडून घेणे आहे' त्यामुळे तिने त्याला सांगितले की, घरी कोणी नाही तुम्ही नंतर या त्यावरून तिला आरोपीने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व वाईट उद्देशाने तिला मिठी मारली व तिची छाती दाबली हे स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच, सदर झटापाटीमध्ये आरोपी खाली पडला व त्याच्या डोक्याला मार लागला हे देखील नाकबुल केले आहे. याउलट साक्षीदाराने तिच्या पुराव्यादरम्यान हे कबूल केले आहे की, तिचे व आरोपीचे न्यायालयाबाहेर आपसात मिटले असल्याचे कथन केले.

११. आरोपीवरील गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने इतर साक्षीदार तपासणे गरजेचे होते. परंतु, कोणतेही साक्षीदार तपासले गेलेले नाहीत. या प्रकरणातील मुख्य साक्षीदार फिर्यादी सा.क्र.०१ हिने आरोपीने तिची छाती दाबली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली हे नाकबुल केले आहे. बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२६ वर मान्य केला आहे. परंतु फिर्यादीला आरोपीने फिर्यादीची छाती दाबली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली हे मान्य केलेले नाही. तसेच, अभिलेखावर असा कोणताही पुरावा आलेला नाही की ज्यावर असे सिद्ध केले जाईल की, आरोपीने फिर्यादीची छाती दाबली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा मान्य केला ही बाब अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

पटलावरुन असे दिसून येते की, आरोपी व फिर्यादी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्याबाबत त्यांनी नि.क्र.२५ वर संयुक्त पुरसीस दाखल केली आहे.

१२. पटलावरील उपलब्ध पुराव्यावरुन आरोपीने फिर्यादीची छाती दाबून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब सिद्ध होत नाही. अभियोग पक्षाने असा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही की, ज्यावरुन आरोपीविरुद्ध गुन्हा हा संशयापलीकडे सिद्ध केला जाईल. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष **'नकारार्थी'** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.०४ करीता</u>** -

१३. मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ च्या निष्कर्षावरुन अभियोग पक्ष आरोपीवरील आरोप सिद्ध करु शकला नसल्याने आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **शंकर सोनाजी खराद** यांस भारतीय दंड विधान ३५४, ५०४ व ५०६ या कलमांखालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक मुचलके व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु. ५०,०००/- चा जामिन बंधपत्र द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात दिनांक २०.०४.२०२६ रोजी घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHWETA SHIVPRASAD PARIHAR
Location: Ambad, Tq. Ambad, Dist. Jalna
Date: 2026.04.20 16:25:06 +0530

दि. २०.०४.२०२६.

**(श्वेता एस. परीहार)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्या.क्र.३), अंबड.

## <u>प्रमाणपत्र</u>

| प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ फाईल मधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे. | |
|---|---|
| **लघुलेखकाचे नांव** | के.एम.कुदर |
| **कार्यालयाचे नाव** | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अंबड. न्यायालय क्र.३. |
| **दिनांक** | २०/०४/२०२६ |
| **पी.डी.एफ दिनांक** | २०/०४/२०२६ |
| **अपलोड दिनांक** | २०/०४/२०२६ |

**स्वा/**
लघुलेखक